# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
# Date – 05 January 2026
# Time 01.00 to 01.05 PM
# Language Marathi
# आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर
# प्रादेशिक बातम्या
# दिनांक ०५ जानेवारी २०२६ दुपारी १.०० वा.

****

गुजरातमधलं सोमनाथ मंदिर वारंवार झालेल्या हल्ल्यानंतरही देशाच्या चिरस्थायी आत्म्याचं प्रतीक म्हणून उभं असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. या मंदिरावरील पहिल्या आक्रमणाला यावर्षी एक हजार वर्ष पूर्ण होत आहेत, तसंच सोमनाथ मंदीराच्या जीर्णोद्धाराला आणि भाविकांसाठी पुन्हा उघडण्याच्या घटनेला ७५ वर्षे पूर्ण होत असल्याच्या निमित्त पंतप्रधानांनी समाज माध्यमांवर एक लेख प्रसिद्ध केला. जानेवारी १०२६ या साली गजनीच्या महमूदने या मंदिरावर हल्ला केला होता. सोमनाथची कथा ही केवळ एका मंदिराची नाही, तर देशाच्या संस्कृति आणि सभ्यतेचं रक्षण करणार्या भारतमातेच्या असंख्य पुत्रांच्या अतुलनिय शौर्याची कथा असल्याचं पंतप्रधानांनी नमूद केलं. सोमनाथ आणि काशी विश्वनाथसह देशभरातल्या अनेक मंदिरांच्या जीर्णोद्धारात अहिल्याबाई होळकर यांच्या भूमिकेचं त्यांनी कौतुक केलं. इतकी आक्रमणं सहन करुनही सोमनाथ मंदिर पुन्हा उभं राहू शकतं, तर देशालाही पूर्वीचं वैभव पुन्हा मिळू शकेल, असा विश्वास पंतप्रधानांनी व्यक्त केला.

****

कोणतंही राष्ट्र केवळ संसाधनं, तंत्रज्ञान किंवा आर्थिक सामर्थ्यावर महान ठरत नाही, तर राष्ट्राची खरी ताकद त्याच्या मूल्यांवर आधारित आदर्शांवर ठरते, असं प्रतिपादन संरक्षण मंत्री राजनाथ सिंग यांनी केलं. गोव्यात आज ‘समुद्र प्रताप’ या भारतीय तटरक्षक दलाच्या पहिल्या प्रदूषण नियंत्रण जहाजाचं जलावतरण राजनाथ सिंग यांच्या हस्ते करण्यात आलं, त्यावेळी ते बोलत होते. समुद्र प्रताप हे नाव समुद्राच्या प्रतिष्ठा, शक्ती आणि संरक्षणाचं प्रतीक असून, हे जहाज तटरक्षक दलाचा तसंच भारताचा आत्मविश्वास वाढवेल, असं त्यांनी नमूद केलं. या जहाजाबद्दल माहिती देताना ते म्हणाले,

**बाईट – संरक्षण मंत्री राजनाथ सिंग**

'समुद्र प्रताप'मुळे भारतीय तटरक्षक दलाच्या प्रदूषण प्रतिसाद, अग्निशमन आणि सागरी सुरक्षा क्षमतांमध्ये लक्षणीय वाढ होणार असून, यामुळे आत्मनिर्भर भारत आणि मेक इन इंडिया उपक्रमांना अधिक बळ मिळणार असल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

२०२० सालच्या दिल्ली दंगल प्रकरणातले आरोपी उमर खालिद आणि शरजील इमाम यांची जामीन याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळली आहे. या आरोपींविरोधात बेकायदेशिर कारवाया प्रतिबंधक कायदा – युएपीए अंतर्गत खटला दाखल होऊ शकतो, असं न्यायालयानं म्हटलं आहे. न्यायमूर्ती अरविंद कुमार आणि न्यायमूर्ती एन व्ही अंजारी यांच्या पीठानं या प्रकरणातल्या अन्य पाच आरोपींना जामिन मंजूर केला आहे. फेब्रुवारी २०२० मध्ये नागरिकत्व सुधारणा विधेयकाविरोधात झालेल्या आंदोलनात ५३ जणांचा मृत्यू झाला होता.

****

देशभरात आज राष्ट्रीय पक्षी दिन साजरा केला जात आहे. पक्षी हे केवळ निसर्गाचं सौंदर्य वाढवणारे घटक नसून, ते संपूर्ण परिसंस्थेचा अविभाज्य भाग आहेत, याची जाणीव करून देण्यासाठी हा दिवस दरवर्षी पाळला जातो. पक्ष्यांचं संरक्षण करणं, त्यांच्या नैसर्गिक अधिवासाचं जतन करणं आणि निसर्गातील समतोल कायम राखणं, हा या दिवसाचा मुख्य उद्देश आहे.

****

धाराशिव जिल्ह्यात कळंब तालुक्यातल्या रांजणी इथल्या नॅचरल उद्योग समूहाच्या वतीने ऊस उत्पादन वाढीसाठी विकसित करण्यात आलेल्या कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित तंत्रज्ञान प्रकल्पाचा भव्य शुभारंभ काल जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला. कृषी क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्तेचा योग्य वापर केल्यास उत्पादनात लक्षणीय वाढ शक्य असल्याचं जिल्हाधिकारी यावेळी म्हणाले. या उपक्रमामुळे शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने उत्पादन वाढीसाठी मार्गदर्शन मिळणार असून, शेती अधिक शाश्वत, नफा देणारी आणि आधुनिक करण्यास या प्रकल्पाचा मोठा लाभ होणार आहे, असा विश्वास उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केला.

****

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात फुलंब्री इथल्या जिल्हा परिषद शाळेत आज ५३व्या जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनाचा समारोप आणि बक्षिस वितरण कार्यक्रम जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्या उपस्थितीत पार पडला. विकसित भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी वैज्ञानिक दृष्टीकोन, संशोधन वृत्ती आणि नवोन्मेषाला प्रोत्साहन देणाऱ्या उपक्रमांची गरज असल्याचं प्रतिपादन स्वामी यांनी यावेळी व्यक्त केलं. या प्रदर्शनात जिल्ह्यातल्या विविध शाळेतल्या विद्यार्थ्यांनी ७० प्रयोगांचे सादरीकरण केलं.

****